पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ४०२ दिनांक - ३१/०५/२०२३**

## युनिट १,गुन्हे शाखा,पुणे शहर
## डेप्युटी सेक्रेटरी या पदावर गोपनीय काम करीत असल्याची बतावणी करणारा तोतया आय.ए.एस.अधिकारी जेरबंद

दिनांक २९/०५/२०२३ रोजी सकाळी ०८/३० वा ते ०९/३० वा चे दरम्यान बंगला नं. ३५१,सिंध हौसिंग सोसायटी,औंध,पुणे येथे बॉर्डर लेस वर्ल्ड फाऊंडेशन या संस्थेने जम्मु काश्मीर येथे मदतीसाठी अॅब्युलन्स लोकार्पण सोहळा आयोजीत केला होता.सदर कार्यक्रमाचे वेळी संस्थेचे ट्रस्टी व सदस्य विरेन शहा,सुहास कदम, पी.के.गुप्ता,प्रकाश गोरे,गोसावी व समाधान शंकर कदम हे हजर होते.त्या कार्यक्रमात पाहुणे म्हणुन आलेले **एक इसम ज्यांनी आपले नाव डॉ.विनय देव असे सांगुन ते स्वतः आय.ए.एस.या पदावर सध्या पंतप्रधान कार्यालय दिल्ली येथे डेप्युटी सेक्रेटरी या पदावर असून ते गोपनीय काम करीत आहेत असे सांगीतले.** त्यावेळी उपस्थीत संस्थेच्या सदस्यांनी त्यांचेकडे चौकशी केली असता त्यांना त्याचे आय.ए.एस.पदाबाबत संशय वाटल्याने सदरची माहीती त्यांनी मा.वरिष्ठांना कळवली होती.त्यानुसार मा.वरिष्ठांनी वपोनि शब्बीर सय्यद यांना सदर इसमाबाबत खात्री करुन कायदेशीर कारवाई करण्याच्या सुचना दिल्या होत्या.त्यानुसार वपोनि.श्री शब्बीर सय्यद यांनी लागलीच युनिट-१ कडील सपोनि आशिष कवठेकर व अंमलदार यांची टीम तयार करुन त्यांना मार्गदर्शन केले. त्यानंतर युनिट -१ कडील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी सदर इसमाचे मोबाईल नंबरची माहीती काढुन तसेच त्याचे लोकेशन प्राप्त करुन अधिक तपास केला असता सदर इसम सध्या तळेगाव दाभाडे पुणे येथे रहात असल्याची माहीती प्राप्त झाली.त्यानुसार दि.३०/०५/२०२३ रोजी युनिट-१ चे अधिकारी व अंमलदार हे डॉ.विनय देव नाव सांगणाऱ्या इसमाचा तळेगाव दाभाडे परिसरात शोध घेत असताना प्लॉट नं.३३६,रानवारा मनोहर नगर, वरद विनायक मंदिराजवळ,तळेगाव दाभाडे,पुणे येथे सदर इसम मिळून आल्याने त्याला त्याचे नाव पत्ता विचारता त्याने आपले **नाव डॉ.विनय देव वय ५४ वर्ष रा.सदर असे असल्याचे सांगीतले.त्याचेकडे अधिक विचारणा करता त्याने मी आय.ए.एस.अधिकारी म्हणुन सध्या डेप्युटी सेक्रेटरी या पदावर पंतप्रधान कार्यालय दिल्ली येथे आहे असे सांगीतले.**त्याचे बोलण्यावर संशय आल्याने त्यास अधिक विश्वासात घेवून विचारपुस केली असता त्याने त्याचे **खरे नाव वासुदेव निवृत्ती तायडे,मुळ रा.मु.पो.किनगाव,ता.यावल,जि.जळगाव व शिक्षण बी.कॉम.एम.ए. झाले असल्याचे सांगितले.तसेच त्यास आय.पी.एस.व आय.ए.एस.होता न आल्यामुळे तो लोकांमध्ये वावरताना स्वतःची ओळख डॉ.विनय देव,आय.ए.एस.अधिकारी अशी सांगत असल्याची माहिती दिली आहे.**

सदर इसमास ताब्यात घेवून युनिट-१, गुन्हे शाखा कार्यालय याठिकाणी आणुन तो आय.ए.एस. अधिकारी नसताना कार्यक्रमामध्ये उपस्थीत लोकांना तो आय.ए.एस.अधिकारी असल्याचे सांगून सध्या तो डेप्युटी सेक्रेटरी या पदावर पंतप्रधान कार्यालय दिल्ली येथे कार्यरत असल्याची बतावनी करून लोकांची फसवणुक करीत असल्याचे निष्पन्न झाल्याने त्याचेविरूध्द फिर्याद देवुन **चतुश्रृंगी पोलीस स्टेशन गु.र.नं.३५४/२०२३ भा.द.वि.१७०,४१९ प्रमाणे गुन्हा दाखल** करण्यात आला आहे.सदर आरोपीने आणखी गुन्हे केले असल्याची दाट शक्यता असल्याने त्याचेकडे अधिक तपास **सपोनि आषिश कवठेकर युनिट १ हे करत आहेत.**

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार , मा.सह पोलीस आयुक्त,पुणे शहर, श्री.संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप-आयुक्त,गुन्हे,पुणे शहर,श्री. अमोल झेंडे मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे-१,पुणे शहर श्री.सुनिल पवार,यांच्या मार्गदर्शनाखाली युनिट-१ कडील वपोनि शब्बीर सय्यद,सपोनि आशिष कवठेकर,पोउप निरी अजय जाधव,सुनिल कुलकर्णी पोलीस अंमलदार राहुल मखरे,इम्रान शेख,निलेश साबळे,अभिनव लडकत यांनी केली आहे.